# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

३० नोव्हेंबर, २०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


# चंद्रपुर पोलीस दलातर्फे शाळा महाविद्यालयीन प्रार्यायांची बैठक आयोजीत

शालेय जिवनामध्ये विद्यार्थ्यांना घडवण्यामागे शिक्षक महत्वाची भुमिका बजावितात. सद्यास्थितीत शालेय महाविद्यालयीन मुले मुली हे मोबाईल फोन, इंटरनेट इत्यादीचा वापर मोठया प्रमाणात करीत असल्याने त्याचा विद्यार्थ्यांच्या जिवनावर वाईट परिणाम होवुन नये किंवा वेगवेगळया मार्गाने व्यसनाधीन होवू नये. याकरीता पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे संकल्पनेतुन आज दिनांक ३०/११/२०१९ रोजी चंद्रपुर, बल्लारशाह आणि घुग्घुस येथील शाळा आणि महाविद्यालयीन प्राचार्य/मुख्याध्यापक यांची बैठक आयोजीत करण्यात आली होती.

तरुणांमध्ये ड्रग्ज ॲडीक्शन व्यसन कशाप्रकारे होते, त्याचे लक्षणे कसे असतात व त्यावर आपण कोणत्या उपाय योजना करु शकतो. याबाबत पोलीस अधीक्षक सदर बैठकीदरम्यान उपस्थित प्राचार्य/मुख्याध्यापक यांना पॉवर पाईन्ट प्रझेंटेशनद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस अधीक्षक यांनी प्राचार्यांना माहिती दिली की, आपण आपल्या शाळा महाविद्यालयाच्या परिसराची पुरेपुर माहिती ठेवावी. शाळा परिसरात अनोळखी मुले येवु नये, विद्यार्थी शाळेत नियमित येतो कींवा नाही याबाबत तसेच त्यांच्यामध्ये काही बदल दिसुन येतात का? याबाबत सुध्दा माहिती ठेवावी. त्याचप्रमाणे पालक व शिक्षक यांची महीन्यातुन एकदा तरी बैठक घ्यावी व चंद्रपुर पोलीस दलातर्फे सुरु करण्यात आलेल्या पोलीस सारथीच्या सदस्यांना किंवा स्थानिक पोलीस अधिकारी यांना बोलावुन पालकांसोबत चर्चा करावी. आज रोजी बैठकीकरीता उपस्थित असलेल्या काही प्राचार्य यांनी सुध्दा त्यांच्या अडचणी सांगितल्या. सदर अडचणी कायदेशिरमार्गाने सोडविण्याकरीता पोलीस प्रशासन सदैव तत्पर असल्याचे पोलीस अधीक्षक यांनी आपल्या मार्गदर्शानामध्ये सांगितले. त्याचप्रमाणे पोलीस सारथी उपक्रमाबाबत सुध्दा माहिती देण्यात आली.

सदर बैठकीकरीता श्री. डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर श्री. शिलवंत नांदेळकर यांचे सह चंद्रपुर उपविभागातील पोलीस अधिकारी आणि शाळा महाविद्यालयीन ९० ते १०० प्राचार्यांची उपस्थिती होती.

---